# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./३५१९/२०२६ दि.२९ /१०/२०२६

## परिपत्रक

विषय :- दिनांक 23 ऑक्टोबर, 2026 रोजी होणाऱ्या निवडणूकीच्या अनुषंगाने मतदारसंघातील पदवीधर / शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे पत्र दि. 01/10/2026.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, ३ पदवीधर व 2 शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक – 2026 या निवडणूकीचे मतदान दिनांक 23 ऑक्टोबर, 2026 रोजी होणार आहे. सदर निवडणूकीकरीता संबंधीत मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करणेबाबत संदर्भिय पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक 23 ऑक्टोबर, 2026 रोजी होणाऱ्या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी संदर्भिय शासन परिपत्रकानूसार उचित कार्यवाही घ्यावी.

तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले नियमित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांचे उक्त पदवीधर / शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीचे मतदान असल्यास, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात येणार आहे. तसेच कंत्राटी कर्मचारीय यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी दोन तासांची विशेष सवलत देण्यात येणार आहे. संबंधित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांनी संबंधित आस्थापनेस / विद्यापीठ प्रशासनास तसे कळवून निवडणूकीच्या दिवशी आपला मतदानाचा हक्क बजावावा.

करीता सर्वांनी नोंद घ्यावी.

संलग्न – वरीलप्रमाणे

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख / समन्वयक/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित. तसेच सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना निदर्शनास आणून द्यावे.
५. आदर्श पदवी महाविद्यालय, STRC, UIT, CIIIT यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. सहा. कुलसचिव / उपकुलसचिव, महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांना अवगत करुन द्यावे.
८. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : सीआयई /२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/ नि-१
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२६.
Email:conduct-election@mah.gov.in

प्रति,

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ व
अमरावती विभाग व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ.

**विषय :- ३ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत....**

महोदय / महोदया,

भारत निवडणूक आयोगाच्या दि. २२ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकान्वये औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग या पदवीधर तसेच अमरावती विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

सदर निवडणुकीचे मतदान दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ८.०० ते सायं. ४.०० पर्यंत व मतमोजणी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२६ (मंगळवार) रोजी होणार आहे.

या निवडणुकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५B नुसार भर पगारी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०६.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवीधर/शिक्षक निवडणुकीमध्ये मतदार असलेल्या व्यक्तीला विशेष नैमित्तिक रजा जाहीर केलेली आहे, सदरचा शासन निर्णय या कार्यालयाच्या www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची रजा ही त्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

तसेच सदर निवडणुकीकरीता मतदार असणाऱ्या खाजगी आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या मतदारांना सदर विशेष नैमित्तिक रजा लागू होत नाही. याकरीता, खाजगी आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदान करण्यासाठी २ तासांची विशेष सवलत देण्याबाबत विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या स्तरावरुन खाजगी आस्थापनांना सूचना देण्यात याव्यात. तसेच याबाबींना व्यापक प्रसिद्धी ही देण्यात यावी ही विनंती.

आपला

(अरविंद शेटे)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत:- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
(औरंगाबाद, पुणे, नागपूर व अमरावती विभागातील जिल्हे)

D:\krushna\पदवीधर व शिक्षक मतदारसंघाची द्वार्षिक निवडणूक-२०२६\विशेष नैमित्तीक रजा.docx